**B.A. (Part–III) Examination**

**(Literature of Modern Languages)**

**MARATHI LITERATURE**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

1. पुढील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : 20

(अ) "ह्या भ्रमिष्टांच्या समाजात घेरी आणणारी अस्थिरता हेच सत्य आहे."

**किंवा**

"सान्फ्रान्सिस्को हे निसर्गाने आणि माणसाने मिळून रचलेले एक वर्धमान महाकाव्य आहे."

(आ) "आमच्या देशातील लाखो पोरे बाल्य भोगत नाहीत - निरोगी तारुण्य नाही - भोगतात फक्त वार्धक्य !"

**किंवा**

"एकीच्या मागे बर्फाचा महापर्वत उभा आहे, तर दुसरीच्या पायी असळत्या पाण्याच्या महासागराचे ऐश्वर्य लोळण घेत आहे. दोघीही दिसायला किती देखण्या !"

(इ) "बेलदारबी चोरच असत्याती. त्याईला काम दिवू नी."

**किंवा**

"ए आय घाल्या हो, बायका पोराईला हानू नका. एखादं मेलं तर जेल व्हईल. फासी व्हईल, गाव जाईल. नवा कायदा निगाला म्हनत्यात."

(ई) "अरे ही, मही म्हनजे आसरुबाची-आसरुबा बेलदाराची आत्मकहाणी आहे. आबे अशोक, हितच असरुबा बेलदार संपला रे. बघ मला ह्या बिराडानं, बेलदार जातीनं केवढं मोठं दु:ख दिलं. कधीही न संपणारं."

**किंवा**

"अशोक आता मी ह्या दुखण्यातून बाचू शकत नाही. मी जरी मेलो तरी आपल्या समाजपरिवर्तनाचा लढा तू चालू ठेव. फुले आंबेडकरांचे विचार जिवंत ठेव. तुझ्यातले फुले, आंबेडकर मरु देऊ नको, मला वचन दे.

2. बर्कले आणि स्टॅनफर्ड विद्यापीठांविषयी पु.ल. देशपांडे यांनी सांगितलेली माहिती तुमच्या शब्दात लिहा. 20

**किंवा**

'एक बेपत्ता देश' म्हणून पु.ल. देशपांडे यांनी अमेरिकेची ओळख कशी करून दिलेली आहे ? ते सांगा.

3. 'बिराड' आत्मकथनातील स्त्री अत्याचाराचे चित्रण करा. 20

**किंवा**

स्वकथन म्हणजे काय ते सांगून 'बिराड' ह्या स्वकथनाची वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

4. वाक्यांचे विविध प्रकार सविस्तर स्पष्ट करा. 20

**किंवा**

भाषेचे स्वरूप स्पष्ट करून भाषेचे विविध उपयोग सांगा.

5. बोली व प्रमाणभाषेची व्याख्या सांगून त्यातील फरक स्पष्ट करा. 20

**किंवा**

पुढीलपैकी कोणत्याही **दोनवर** टिपा लिहा :

(1) स्वरांचे वर्गीकरण

(2) रूपिकांतरांचे प्रकार

(3) शब्दसिद्धी विविध घटना

(4) उच्चारण व लेखन यातील अंतर आणि त्याची कारणे.